स्वामित्व योजना (गावठाण जमाबंदी प्रकल्प) पूर्ण झाल्यानंतर भूमि अभिलेख विभागास उपलब्ध करून दिलेला निधी ग्राम विकास विभागास परत करण्यापासून सूट देणेबाबत.....

# महाराष्ट्र शासन

## महसूल विभाग

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११३/भूमापन**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : १६ जुलै, २०२६.**

**संदर्भ** :- ग्राम विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण २०१८/प्र.क्र.१३/ मातंक, दि.२२.२.२०१९

**प्रस्तावना:-**

ग्राम विकास विभागाच्या संदर्भिय शासन निर्णय दि.२२.२.२०१९ अन्वये राज्यातील गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामधील मुद्दा क्र.८ नुसार वसूल केलेली सनद फी स्वतंत्र खात्यात जमा करून पुन्हा गावठाण जमाबंदी प्रकल्पाच्या कामासाठी वापरण्याची अनुमती दिली आहे. तसेच, ग्राम विकास विभागाकडील प्राप्त निधी हा काम/प्रकल्प पूर्ण झाल्यावर ग्राम विकास विभागाने भूमि अभिलेख कार्यालयास जेवढा निधी आगाऊ स्वरूपात उपलब्ध करून दिला होता, तेवढा निधी ग्रामविकास विभागास परत करावयाचा आहे. भूमि अभिलेख विभागाकडे जमा करण्यात आलेली भूमापन फी व उपलब्ध शिल्लक निधीचा उपयोग स्वामित्व-१ योजनेंतर्गत उर्वरित गावांचे काम पूर्ण करणे व नगर भूमापन पूर्ण करणे व गावठाणा बाहेरील विस्तारित क्षेत्रामध्ये स्वामित्व-२ योजनेच्या कामाकरीता करणे आवश्यक आहे. त्यामुळे स्वामित्व योजनेअंतर्गत ग्राम विकास विभागाकडील प्राप्त निधी हा काम/प्रकल्प पूर्ण झाल्यावर ग्राम विकास विभागाने भूमि अभिलेख कार्यालयास जेवढा निधी आगाऊ स्वरूपात उपलब्ध करून दिला होता, तेवढा निधी ग्रामविकास विभागास परत करण्यापासून सूट देण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुषंगाने मा.मंत्रिमंडळाच्या दि.०८.०७.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ मधील तरतुदींस अनुसरून राज्यातील गावठाण जमाबंदी प्रकल्प (स्वामित्व योजना) राबविण्याकरिता भूमापन खर्च म्हणून ग्राम विकास विभागाने भूमि अभिलेख विभागास रू.६३,६८,००,०००/- (रु.त्रेसष्ट कोटी अडूसष्ट लक्ष) इतका निधी वितरीत केला आहे. आता, ग्राम विकास विभागाने भूमि अभिलेख विभागास उपलब्ध करून दिलेला रू.६३,६८,००,०००/- (रु.त्रेसष्ट कोटी अडूसष्ट लक्ष) इतका निधी ग्राम विकास विभागास परत करण्यापासून सूट देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. स्वामित्व योजनेअंतर्गत भूमि अभिलेख विभागाकडे जमा करण्यात आलेली भूमापन फी व उपलब्ध शिल्लक निधीचा उपयोग खालील नमूद कार्यवाहीसाठी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.:-

अ. स्वामित्व-१ योजनेंतर्गत उर्वरित गावांचे काम पूर्ण करणे व नगर भूमापन पूर्ण करणे.

ब. गावठाणा बाहेरील विस्तारित क्षेत्रामध्ये स्वामित्व-२ योजना राबविणे.

३. तसेच, स्वामित्व-२ योजना राबविण्याकरीता अतिरिक्त निधीची आवश्यकता भासल्यास त्याबाबत नियमानुसार स्वतंत्ररित्या तरतूद करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय ग्राम विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संकेतांक २०२६०७१६१७२३०२३३४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.07.16 17:24:37 +05'30'

**( संजय बनकर )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.

४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव.
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
६. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
७. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८. सर्व मा. विधान सभा सदस्य व विधान परिषद सदस्य
९. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
१०.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज, बांधकाम भवन, मुंबई
११.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१२.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१४.महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१५.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६.विभागीय आयुक्त (सर्व).
१७.जिल्हाधिकारी (सर्व).
१८. भूमापन कार्यासन संग्रहार्थ